सेवक संघ महाराष्ट्र रौप्य महोत्सवी वर्ष-२०२२

# सेवक वार्ता

नोव्हेंबर-२०२२ वर्ष -४, अंक-१

**कार्यालय** - संत एकनाथ नगर, भाग-१ 'यशोपर्व', एनव्हीजन कॉम्प्युटर ट्रेनिंग सेंटर, बिबवेवाडी, पुणे - ४११०३७

## सेवक संघाची सन २०२१-२२ ची आमसभा अमरावती येथे होणार

दिनांक २० जानेवारी २०२३ रोजी , अमरावती येथील प्रबोधिनीत सेवक संघाची आमसभा होत आहे. शाखा प्रमुखांनी कार्यक्रमास उपस्थित राहणाऱ्या सदस्यांची नावे कळवावी अशी विनंती अमरावती शाखेने केलीआहे.

### कार्यक्रमाची रूपरेषा.

**दिनांक २० जानेवारी**

(१)सकाळी १०.०० ते १०.३० - पदाधिकारी परिचय व स्वागत.

(२) १०.३० ते १०.४५ - प्रास्ताविक - कार्यकारी अध्यक्ष -संघाची वाटचाल व नवीन संधी

(३) १०.४५ ते ११.१५ - सन २१-२२ खर्च मंजुरी व आर्थिक विश्लेषण - सचिव

(४) ११.१५ ते ११.३० - शाखा कार्य अहवाल २०२१-२२ - अमरावती, धुळे, पुणे, औरंगाबाद, नागपुर, चंद्रपूर

(५) ११.३० ते १२.१५ - सेवक संघ कार्य, जबाबदारी,पदाधिकारी निवड प्रक्रिया, शाखा पुनरुज्जीवन न होण्याची कारणे व त्यावर उपाय योजना, ठरविलेल्या उदिष्टपैकी किती व कोणते उद्दिष्ट साध्य झाले व जी उद्दिष्ट साध्य झाले नाही त्याची कारणे व त्यावरील उपाय योजना, यावर मंथन

(६) १२.१५ ते १३.०० -भोजन

(७) १३.०० ते १४.०० - दुपारचा कार्यक्रम - स्थानिक निवृत्त वन अधिकारी व कर्मचारी आणि स्थानिक वन संरक्षक, क्षेत्र संचालक मेळघाट, उप वन संरक्षक, आयुक्त, अमरावती, जि. प. मुख्याधिकारी, जिल्हाधिकारी, कृषी अधीक्षक. पाहुण्यांचे स्वागत, परिचय व सेवक स्मृतिचिन्ह आणि औषधी वनस्पती प्रदान करणे. - संचालन श्री. मिलिंद तोरो.

(८) १४.१५ ते १५.०० - सेवक संघ महाराष्ट्र व अमरावती शाखेचे कार्य परिचय - फोटो display सह. अमरावती शाखा सहअध्यक्ष श्री. संजय जगताप

(९) १५.०० ते १५.१५ -अध्यक्ष, श्री. शिरीष अस्थाना यांचे सेवक संघ महाराष्ट्र, वाटचाल बाबत संबोधन.

(१०) १५.१५ ते १५.३० - विशिष्ट व्यक्ती, संस्था यांचे विशिष्ट वन कार्याबद्दल सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह देवून सन्मान.

(११) १५.३० ते १६.०० -चहापान

(१२) १६.०० ते १६.२५ - विशिष्ट विषयावर २ तज्ञाचे संबोधन

(१३) १६.२५ ते १७.२५ - मान्यवरांचे संबोधन

(१४) १७.२५ ते १८.०० - आभार प्रदर्शन - सचिव अमरावती शाखा

(१५) १८.०० ते १८.१०- डीप टी.

**दिनांक २१.१.२३** रोजी मेळघाट भ्रमंती करिता इच्छूक सेवक सदस्य यांना वाहन व भोजनाची व्यवस्था करुन देण्यात येईल. (वैयक्तिक खर्चाने)

रेल्वेने येणाऱ्या सदस्य करिता दि.२०.१.२३ रोजी बडनेरा रेल्वे स्टेशन येथे वाहन उपलब्ध करून देण्यात येईल.

## मु. का. अ. महा-कॅम्पा यांचेशी मूल्यांकन कामासाठी समझोता

मु.का.अ.महा-कॅम्पा,नागपूर यांचेशी खालील कामांचे मूल्यांकनासाठी समझोता अभिलेख करण्यात येत आहे. (१) रोपवने - ६२९ हे. -२८ स्थळे (२) रस्ता दुतर्फा लागवड - ५२५ किमी. १७४ स्थळे (३) जल-मृद संधारण सीसीटी कामे -९९ कामे - सेवक संघाचे जेष्ठ सदस्य व अनेक कामांचे समन्वयक, मार्गदर्शक श्री. पत्की यांच्या प्रयत्नातून महाराष्ट्रातील धुळे, ठाणे व नागपूर वनवृत्तातील पाणलोट क्षेत्रात उपचार दिलेल्या ४६ स्थळांचे मूल्यांकनासाठी आदेश अपेक्षित आहेत.

## सेवक संघ सदस्यांची यशदातर्फे आयोजित कार्यशाळेसाठी निवड

संचालक, चंद्रपूर वन प्रशासन, विकास व व्यवस्थापन प्रबोधिनी चंद्रपूर यांनी सेवक संघाचे सदस्य श्री व्ही. टी. पत्की व एस के गवळी यांच्या नावाची पुणे येथे यशदा मार्फत आयोजित प्रशिक्षण कार्यक्रम व कार्यशाळेसाठी नामनिर्देशन केले होते. सदर कार्यशाळा ही १९ ते २३ डिसेंबर २०२२ दरम्यान होत आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमाचा विषय "शाश्वत विकास ध्येय". हे नामनिर्देशन म्हणजे सेवक संघाचा एक प्रकारे हा गौरव असून सेवक संघ करत असलेल्या कामाची दखल घेऊन सन्मानित करण्यात आले आहे.

## सा.व. विभाग कामांचे मुल्यांकन

बांधावरील लागवड आणि गट लागवड मुल्यांकनासंबंधी सा. व. विभागाशी श्री. पत्की सर वाटाघाटी करीत असून त्यांनी काही मुद्दे उपस्थित केले आभ्ेत जसे की, जिल्हावार लाभार्थिंची संख्या दिलेली आहे, परंतु त्यातील किती टक्के करावयाची आहे हे नमूद केलेले नाही.

लाभार्थीची निवड मूल्यांकनासाठी बांधावर लागवड केलेले आणि गट लागवड केलेले लाभार्थी यांची तालुकावार आणि गाववार नावा - सहित यादी दिलेली नाही.

हा तपशील प्राप्त झाल्यानंतर मूल्यांकनाचे दरपत्रक तयार करणे शक्य होईल, अशी संपूर्ण माहीती पाठविणेची विनंती केली आहे.

बहुतेक जास्त मान्सून प्रदेशातील कामे सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यात आणि कमी मान्सून प्रदेशातील कामे जालना जिल्ह्यात आहेत. या जिल्ह्यातील दोन तालुक्यात मूल्यांकन केल्यास, कमीत कमी कालावधीत क्षेत्रीय भेटी देऊन, मूल्यांकनाचा अंदाज बांधता येईल. त्या दृष्टीने विचार करून, अटी व शर्तीत सुधारणा व्हावी असा प्रस्ताव दिला आहे. मूल्यांकनासाठी शासन मंजूर अनुदानाची रक्कम कळविल्यास, मूल्यांकनाची टक्केवारी ठरविण्यास उपयुक्त ठरेल. उचीत कार्यवाहीची विनंती केली आहे.

## सेवक संघाची कायदे विषयक प्रशिक्षण देण्यासाठी निवड

वनविकास महामंडळातील वन अधिकारी व कर्मचारी यांना सेवक संघाद्वारे कायदेविषयक प्रशिक्षण देण्यासाठी निवड झाली असून तसे १९ ऑक्टोबर २०२२ चे पत्र प्राप्त झाले आहे. त्याअंतर्गत नागपूर व चंद्रपूर प्रदेशातील वनाधिकारी कर्मचाऱ्यांना वन प्रशासन व विकास व्यवस्थापन प्रबोधिनी चंद्रपूर येथे, तर नाशिक प्रदेशातील वन अधिकारी व कर्मचाऱ्यांना वन प्रशिक्षण संस्था शहापूर येथे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. प्रशिक्षण शिबिरास प्रत्येक वन प्रकल्पातून २ सहा. व्यवस्थापक, ४ वनपरिक्षेत्र अधिकारी, ६ वनपाल व १३ वनरक्षक असे २५ प्रशिक्षणार्थी उपस्थित राहणार असून प्रत्येक महिन्यात एक प्रशिक्षण शिबिर होणार आहे. चंद्रपूर येथे ९ शिबिरे व शहापूर येथे २ प्रशिक्षण शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. त्या संबंधात तारखा निश्चितच करण्यात येणार आहे. सेवक संघाच्या दृष्टीने ही मोठी उपलब्धी आहे.

## श्री एस के गवळी यांना जिल्हाधिकारी धुळे जिल्ह्यातील जलसंधारणसंबंधी कामात विशेष ज्ञान व नैपुण्याचा सहभागासाठी आमंत्रण

भारत सरकारच्या जलशक्ती मंत्रालयातील जल संसाधन नदी विकास व गंगा संरक्षण विभागाने सन २०२० मध्ये राष्ट्रीय स्तरावर घेतलेल्या स्पर्धेमध्ये श्री एस के गवळी यांनी जलसंधारण संबंधात केलेल्या उत्कृष्ट कामाची दखल घेऊन त्यांना वॉटर हिरो म्हणून निवड करून प्रशिस्ती पत्र व रु. १०००० चे बक्षिस देऊन गौरविले होते.

भारत सरकारच्या जलशक्ती मंत्रालयातील सहसचिव यांनी त्यांचे दिनांक ७ जुलै २०२२ च्या पत्रांने जिल्हाधिकारी धुळे यांना धुळे जिल्ह्यात जलस्रोत व्यवस्थापन अंतर्गत जन जागृती उपक्रमाद्वारे संवर्धन व व्यवस्थापन, जलस्रोतांचे पुनर्जीवन, स्वच्छता मोहीम, पावसाच्या पाण्याची साठवण या बाबीसाठी श्री एस के गवळी यांच्या विशेष ज्ञान व नैपुण्याचा उपयोग करून घण्याची शिफारस केली होती व जिल्ह्यातील जलसंधारण कामात त्यांचा सहभाग घ्यावा असे केंद्र शासनाच्या जलसंसाधन विभागाने जिल्हाधिकारी धुळे यांना कळविले होते.

त्यानुसार श्री एस के गवळी यांना जिल्हाधिकारी धुळे यांनी त्यांचे १ जुलै २०२२ चे पत्रान्वये केंद्र शासन पुरस्कृत जलशक्ती अभियान २०२२ अंतर्गत योगदान देणे बाबत आमंत्रित केले आहे. धुळे जिल्ह्यात जलस्रोतांचे व्यवस्थापन अंतर्गत जनजागृती, उपक्रमाद्वारे जलसंवर्धन व जलस्रोतांचे पुनर्जीवन, स्वच्छता मोहीम, पावसाच्या पाण्याची साठवण या बाबीसाठी मार्गदर्शन मिळणे कामी योगदान देण्याबाबत विनंती करण्यात आली आहे. सेवक संघाच्या सदस्यास शासन विभागास सेवाभावी योगदान देण्याबाबतचे आमंत्रण मिळणे हे निश्चितच सेवकसाठी भूषणावह आहे.

**डॉ. शेषराव पाटील यांच्या**
**"सृष्टीचे जीवन गाणे"**
**या कविता संग्रहातून ..........**

### "जैवविविधता"

किती विविध ही जैवविविधता
निसर्ग म्हणा की म्हणा विधाता
तो करता आणि करविता
तोच जीवसृष्टीचा निर्माता
अमिबा कीटकआणि बेडूक व मासे
वाघ सिंह हत्ती देवमासे
शेवाळ, प्रवाळ, गवत व पिंपळ
वड, कडूलिंब, बांबू वा जांभूळ
डोळ्यांनीही न दिसणारे
असती सृष्टीत अनेक सूक्ष्मजीव
काही मातीत काही पाण्यात
काही हवेत विहरती सदैव
तुझी त्यांचेवर निर्भरता
त्यावरच अवलंबून उद्योजगता
किती विविध ह्या अन्नसाखळी
ईश्वराची ही कल्पकता
हवेत जमिनीत व पाण्यात सुंदरता
मानव सोडी तुझी क्रूरता
निसर्ग आहे उदार दाता
होई आता तूच त्याचा त्राता
हे मानवा तुला निर्मिले
जोपासण्या ही जैवविविधता.

## धुळे शाखा विशेष उपक्रम

### नंदुरबार वन विभाग सामुहिक वन हक्क व्यवस्थापन आराखडे तयार करण्याबाबत अपडेट ......

उप वन संरक्षक नंदुरबार वन विभाग यांचेकडून प्रायोगिक तत्वावर एकूण ५ गावांचे व्यवस्थापन आराखडे तयार करण्याचे कामाची प्रगती खालीलप्रमाणे आहे.

तोरणमाळ, बिलमांजरे, असली, वाघाळे या ४ गावांचे व्यवस्थापन आराखडे जिल्हास्तरीय समितीची मंजूरी घेण्यासाठी उप वन संरक्षक, नंदूरबार यांच्याकडे सादर करणेत आले आहेत. नवानगर गावासाठी दिलेल्या वन हक्क जमिनी संदर्भात स्थानिकांचे आक्षेप असून त्याबाबत वनाकि-यांना अवगत केले आहे.

## अमरावती शाखा विशेष उपक्रम

सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ,शाखा अमरावती सातत्याने पर्यावरणाशी संबंधित उपक्रम राबवत असते. आदिवासी गावाची निवड अमरावती सेवक शाखेने गाव विकासासाठी केली. दि.२८.१०.२३ रोजी सेवक संघाने ग्रामस्थांची बैठक घेतली.

विविध विषयांवर सखोल चर्चा झाली- ते सामाजिक कार्य आहे.

१. गावकऱ्यांचे रोजगारासाठी मोठ्या प्रमाणावर स्थलांतर.

2. संपूर्ण वर्षभर गावातच रोजगार निर्मिती.

3. व्यवस्थापन योजनेसह सामुदा - यिक वन हक्कांची अंमलबजावणी.

4. PESA तरतुदींचीअंमलबजावणी.

5. विद्यमान जेएफएमची अंमलबजावणी गावापासून 2.5 किमी अंतरावर असलेल्या चिचाटी धबधब्याचा पर्यटन स्थळ म्हणून विकास.

6. पाणी साठवण VYWS अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती यांच्या मदतीने संवर्धन आगाऊ तंत्रज्ञान.

7.फळांची बाग (नैसर्गिक सीता- फळ JFM द्वारे लावलेल्या वृक्षारोपणात आवळा)

8. ZP.9 द्वारे महिला सक्षमीकरण प्रकल्प.

भविष्यात रामप्रसाद मुखर्जी जन- वन योजनेद्वारे शेतजमिनीवर कुंपण घालण्याच्या शक्यता तपासण्यासाठी. पुढील तपशीलवार चर्चा 11 नोव्हेंबर 2022 रोजी होणार आहे..

## निधन वार्ता



श्री टी एस के रेड्डी, निवृत्त अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक यांचे कर्करोगाने दि. १८-११-२२ रोजी दुखद निधन झाले. आहे. राज्य शासनाच्या बांबू मिशनचे ते शिल्पकार होते. गडचिरोली वृतात मुख्य वनसंरक्षक म्हणून त्यांनी उत्तम कामगिरी बजावली होती. ते ब्लड कॅन्सरने ग्रस्त होते. उच्च दर्जाचे आणि विवेकी अधिकारी होते. रेड्डी तिरुपतीचे राहणारे होते. 2-3 वर्षांपूर्वी निवृत्त झाले होते.. महाराष्ट्र बांबू विकास मंडळ मध्ये काम केले. नाविन्यपूर्ण कामे करण्याची त्यांना फार आवड होती. चंद्र ज्योती बिया व करंज बियापासून बायो डीझेल, बांबुबायो- डिझेल, कोळसा, तेल निर्मितीचा पाठपुरावा करून नवीन दिशा वन व्यवस्थापन समिती व बचत गटास दिली. कर्करोगाने ग्रस्त असताना सुध्दा बांबु विकास मंडळ करिता अत्यंत कठोर परिश्रम घेतले. अतिशय हुशार, कल्पक आणि धडाकेबाज कामगिरी करणारा अधिकारी म्हणून त्यांनी लौकिक मिळविला होता. त्यांच्या आत्म्यास सद्गती प्राप्त होवो हीच ईश्वरचरणी प्रार्थना

## सेवक संघाचे कार्यकारी मंडळाच्या बैठकीचे वृत्तांत

या महिन्यात दि.१-११-२०२२ रोजी बैठक झाली. बैठकीची विषय सूची पुढीलप्रमाणे होती.

१.मग्रायो लाभार्थी मूल्यांकन.

२.कन्हारगाव अभयारण्य व्यव. आराखडा मानधन वाटप प्रगती.

३.CAT मूल्यांकन MoU प्रगती.

४. कोलामार्का अभयारण्य व्यवस्थापन आराखडा तयार करणेसाठी ,CWLW यांना प्रस्ताव पाठविणे बाबत.

५. वनविकास महामंडळातील अधिकारी व कर्मचारी यांना विधी प्रशिक्षण देणे बाबत.

६.नवीन कामांचा शोध घेणे.

७.जानेवारी २०२३ मध्ये सेवक संघाची आमसभा घेणे बाबत.

८.नवनिवृत्त वनाधिकारी यांना सेवक सदस्य करून घेणे.

९.दिवंगत सदस्यांना श्रध्दांजली अर्पण करणे.

१०. नंदुरबार विभागातील सामुहिक वन हक्क व्यवस्थापन आराखडे तयार करण्याचे कामाचा आढावा

११. ऐनवेळी येणारे विषय.

## धुळे शाखेचे श्री.छल्लारे यांना समाजाचा पुरस्कार

श्री. बी. आर. छल्लारे, सहकार्यवाह, सेवक संघ, धुळे शाखा यांना शिर्डी तीर्थक्षेत्री दि. ३०-१०-२२ रोजी त्यांचे कुमावत समाजाने समाज भूषण पुरस्कार व सन्मानपदक देऊन सत्कार केला. सेवक संघातर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन.







केवळ खाजगी वितरणासाठी
प्रकाशक-सेवक संघ, महाराष्ट्र,पुणे
संपादन - एस. के. गवळी